# विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासावी : तहसीलदार भरत सूर्यवंशी



देगलूर(प्रतिनीधी): अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र अंतर्गत करियर कट्टाचे उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून देगलूरचे तहसिलदार भरत सुर्यवंशी , अ.व्या.शि.संस्थेचे संचालक विजय ऊनग्रतवार , उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार , ऊपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे उपस्थित होते.

बक्षीस वितरण कार्यक्रमात कनिष्ट व वरिष्ठ महाविद्यालयातील विविध विषयातील गुणवंत , क्रीडा क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिस प्रदान करण्यात आले.

करिअर कट्टा अंतर्गत सामान्य ज्ञान परीक्षेतील गुणवंत विद्या र्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच फोरम ऑफ फ्री इंटरप्राईजेस आणि अर्थशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेचा बक्षीस वितरण यावेळी करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना तहसीलदार भरत सुर्यवंशी म्हणाले की , देगलूर सारख्या ग्रामीण भागामध्ये उच्च शिक्षणात नावाजलेले देगलूर महाविद्यालय हे या भागातील विद्यार्थ्यांसाठी एक सुवर्णसंधी आहे. महाविद्यालयातील भव्य ग्रंथालय, क्रीडांगण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व इतर सेवा सुविधा यांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा व वाचन संस्कृती जोपासावी असे विचार मांडले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी महाविद्यालयातील पदवी वी पदव्युत्तर अभ्यास क्रम, संशोधन केंद्र, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र , ग्रंथालय, करिअर कट्टा अंतर्गत आयोजित केलेले आयएएस व आयपीएस अधिकाऱ्यांच्या ऑनलाईन व्याख्यानमाला इत्यादी याविषयी सविस्तार माहिती दिली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. महेश कुलकर्णी तर आभार प्रा. शिवचरण गुरुडे यानी मानले.

याप्रसंगी पर्यवेक्षक संग्राम पाटील व कार्यालय अध्यक्ष गोविंद जोशी, गुणवंत विद्यार्थी , पालक , प्राध्यापक, व शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner